# **बोदवड महाविद्यालयाचे सामाजिक कार्य अभिनंदनीय-** डॉ सध्यां सोनवणे

## जलशक्ती अभियान अंतर्गत संशोधन प्रकल्प प्रारंभ

(15.10.2019) बोदवड शहरातील पाणीप्रश्न चिंताग्रस्त असल्याने कायम समस्या निर्माण झाली आहे याबाबत अ स्टडी ऑन वाटर मॅनेजमेंट ऍंड डेफिसेसी इन बोदवड या विषयावर महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी याचे माध्यमातून संशोधन प्रकल्पाच्या सर्वे साठी प्रश्नावलीचे प्रकाशन व सर्वेत सहभागी विद्यार्थ्यांना प्रश्नवली वाटपाचा कार्यक्रम यावल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ सध्यां सोनवणे याचे हस्ते सपन्न झाला या निमित्त जलशक्ती अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी सर तसेच प्रमुख अतिथी व उपप्राचार्य श्री. डी. एस. पाटील सर मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरवातीलाच प्रकल्प लेखनासाठी बनवण्यात आलेल्या प्रश्नावलीचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले, व यानंतर प्रमुख अतिथी व मार्गदर्शक प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना प्रकल्प लेखन व प्रश्नावली भरण्यासंदर्भात महत्त्वाचे मार्गदर्शन केले यामध्ये त्यांनी पाणी व्यवस्थापन, पर्जन्यमापन, सांडपाण्याचे व्यवस्थापन, कुटुंबातील सदस्यांचा दरडोई पाण्याचा वापर यासंदर्भात मार्गदर्शक सूचना मांडल्या, यासोबतच संशोधनामध्ये प्रश्नावलीचे असणारे महत्त्व अधोरेखित केले. व भविष्यामध्ये या जलशक्ति अभियानामुळे पाण्याचा हा बोदवड पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रभर ओळखला जाईल असा आशावाद व्यक्त केला... कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक अरविंद चौधरी सर यांनीदेखील विद्यार्थ्यांना जलशक्ती अभियानाचे वेगवेगळे टप्पे यामध्ये संशोधनाचे महत्त्व, बोदवड मधील पाण्याचे दुर्भिक्ष. जलशक्ती अभियानाच्या प्रश्नावलीचे स्वरूप, प्रकल्प लेखन, प्रश्नावली भरून घेत असताना कोणते मुद्दे विचारात घेणे गरजेचे आहे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमासाठी प्रा.डॉ. मधुकर खराटे, प्रा. पी एन पाटील, प्रा. अजय पाटील, प्रा.डॉ. अनिल बारी , प्रा. नितेश सावदेकर, प्रा. कोटेचा ,प्रा. इंगळे सर, प्रा.डॉ. जवरास ,प्रा. डॉ. गीता पाटील यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.कांचन दमाडे यांनी तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. ईश्वर मसलेकर यांनी केले व आभार प्रदर्शन प्रा. अदिती पाटील यांनी मानले.....तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी श्री. राजू मोपारी, श्री. अतुल पाटील, श्री. दीपक जोशी यांनी परिश्रम घेतले





